| | | |
|---|---|---|
| **MHAK070012022022** | दाखल दिनांक | : ०६.०८.२०२२ |
| | नोंदणी दिनांक | : ०६.०८.२०२२ |
| | निकाल दिनांक | : ०६.०३.२०२६ |
| | कालावधी | : ०३ व ०७ म ०० दि |

| | |
|---|---|
| | **<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर</u>**<br>(पिठासीन अधिकारी श्रीमती डी. एम. पाटील)<br>न्यायनिर्णय घोषित दि. ०६.०३.२०२६<br>**नियमित फौजदारी खटला क्र. २६७/२०२२** |
| **निशाणी क्र. २१** | अपराध क्रमांक : ७८/२०२२<br>पोलीस स्टेशन : बाळापुर, ता. बाळापूर जि. अकोला. |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार,<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>**पोलीस स्टेशन बाळापुर,** ता. बाळापूर, जि. अकोला. |
| **अभियोग पक्षातर्फे वकिल** | श्रीमती एस.आर.लोखंडे, सहाय्यक सरकारी वकिल. |
| **आरोपी** | **राजेंद्र महादेव सिरसाट,**<br>वय– ६० वर्ष, व्यवसाय – शेती,<br>रा. कुपटा, ता. बाळापूर,<br>जि. अकोला. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | विधीज्ञ श्री. पी.आर.पटोकार |

**[फौजदारी मॅन्युअलमधील प्रकरण क्र.६ परीच्छेद ४४]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०७.०२.२०२२ |
| प्रथम खबरी अहवाल दाखल झाल्याची तारीख | ०८.०२.२०२२ |
| दोषारोपपत्राची तारीख | १३.०७.२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १२.११.२०२५ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याची तारीख | २३.०१.२०२६ |
| निकाल राखून ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | ०६.०३.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | -- |

## आरोपीची सविस्तर माहिती.

| आरोपी चा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सुटकेची तारीख | दोषारोपाचे कलम | आरोपीची निर्दोष सुटका झाली कि आरोपीला सजा झाली. | आरोपी ची शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजेंद्र महादेव सिरसाट | -- | समजपत्रावर सोडले | भा.दं.वि. कलम ३२५, ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये | आरोपीची निर्दोष सुटका ०६.०३.२०२६ | -- | -- |

## सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी.

अ. **सरकारी साक्षीदारः-**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | रविंद्र महादेव शिरसाट (नि.क्र. १३) | फिर्यादी |

ब. **बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यासः-**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

क. **न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यासः-**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

## सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तांची यादी.

अ. **सरकार पक्षातर्फेः-**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ब. **बचाव पक्षाने मान्य केलेले दस्तऐवजः-**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| १ | १६ ते १८ | वैद्यकीय कागदपत्रे |
| २ | १९ | घटनास्थळ पंचनामा |
| ३ | २० | जप्ती पंचनामा |

क. **न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले दस्तः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| –– | –– | –– |

ड. **जप्त वस्तुंचे वर्णनः–**

| अनुक्रमांक | वस्तूंचा नंबर | वस्तूचे वर्णन |
|---|---|---|
| १ | –– | एक लाकडी दांडा |

**न्यायनिर्णय**

(घोषणा तारीख ०६.०३.२०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (थोडक्यात 'भा.दं.वि.') कलम ३२५, ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये संपरीक्षा सुरु आहे.

**प्रकरणाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे** –

**२.** फिर्यादी रविंद्र महादेव सिरसाट, रा. कुपटा, ता. बाळापुर, जि. अकोला यांनी पोलीस स्टेशन बाळापुर येथे तक्रार दिली की, दि. ०७.०२.२०२२ रोजी रात्री ०९.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी घरासमोर उभे असतांना आरोपी (फिर्यादीचा भाऊ) याने येऊन शेतीच्या कारणावरुन वाद करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन हातातील लाकडी दांडयाने उजव्या पायाच्या टोंगळ्यावर मारला व जिवे मारण्याची धमकी दिली.

**३.** सदर फिर्याद अन्वये आरोपीविरुध्द बाळापुर पोलीस स्टेशनमध्ये गु.र.क्र. ७८/२०२२ अन्वये भा.दं.वि. कलम ३२५, ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अमंलदार श्री. सुभाष राठोड, पो.हे.कॉ. यांनी प्रकरणाचा तपास करुन तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** सदर न्यायालयाने आरोपीविरुध्द निशाणी ०९ वर भा.दं.वि ३२५, ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे आरोप ठेवले. ते आरोपीस वाचून व समजावून सांगितले असता त्याने नाकबुल करुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

**५.** सदर प्रकरणात (नि.क्र. ११) अन्वये फिर्यादी व आरोपी यांनी तडजोड अर्ज अभिलेखावर दाखल केला. परंतु, आरोपीविरुध्द दाखल करण्यात आलेला गुन्हा भा.दं.वि. कलम ३२४ हा तडजोड पात्र गुन्हा नसल्याने सदर गुन्ह्यासाठी परवानगी नाकारली. सदर प्रकरणात आरोपी व फिर्यादी यांच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झाल्यामुळे तांत्रिक अडचण येवू नये म्हणून अभियोगपक्षाने फिर्यादीला तपासले. आरोपीविरुध्द कोणताही सकृतदर्शनी पुरावा मिळून न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**६.** सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.आर.लोखंडे व आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. पी.आर.पटोकार यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील सर्व पुरावा व कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे प्रश्न निश्चितीकरीता उपस्थित होतात व त्यावर मी माझे निष्कर्ष कारणांसहित नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दि. ०७.०२.२०२२ रोजी रात्री ०९.०० वाजताच्या सुमारास कुपटा, ता. बाळापूर, जि. अकोला येथे आरोपीने फिर्यादीला मारहाण करुन गंभीर दुखापत केली व भा.दं.वि. कलम ३२५ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला लाकडी दांडयाने उजव्या पायाच्या टोंगळयावर मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली व भा.दं.वि. कलम ३२४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानित करुन भा.दं.वि. कलम ५०४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली व भा.दं.वि. कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ५. | काय आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**७.** अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी वरील प्रमाणे फिर्यादीला तपासले. तसेच (नि.क्र.११) अन्वये फिर्यादी व आरोपी यांनी आपसात तडजोड झाली असलेबाबतची तडजोड अर्ज व पुरसीस (नि.क्र.१२) दाखल केलेले आहे. न्यायालयाचा वेळ आणि संसाधनाचा अपव्यय होवु नये म्हणुन इतर साक्षीदारांना तपासुन काही साध्य होणार नसल्याने त्यांना तपासण्यात आले नाही. नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**प्रश्न क्रमांक १ ते ४ करीता** -

**८.** वरील प्रश्न एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रितरित्या नोंदविण्यात येत आहे.

**९.** रविंद्र शिरसाट (स.सा.क्र.१) हे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी असून त्यांनी त्यांच्या साक्षीत, आरोपी त्यांचा सख्खा भाऊ असुन त्यांच्यात घरगुती कारणावरुन बोलचाल झाली होती व त्या व्यतिरिक्त काही झाले नसल्याचे, त्यांनी रागाच्या भरात आरोपींविरुध्द रिपोर्ट दिल्याचे, रिपोर्ट वरील सही त्यांची असल्याचे व त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथन केले.

**१०.** फिर्यादी हे अभियोग पक्षास समर्थन देत नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उलटतपासाच्या अनुषंगाने प्रश्न विचारले परंतु त्यांची व आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असल्याचे त्यांनी मान्य केलेले असुन आरोपीकडून त्यांना मारहाण केल्याचे, शिवीगाळ केल्याचे किंवा धमकी दिल्याच्या बाबी नाकारल्या आहे. सबब, अभियोग पक्षाच्या कथनास बळकटी मिळेल असे त्यांच्या पुराव्यातुन काहीही निष्पन्न झाले नाही.

**११.** वरील सर्व विवेचनावरुन असे आढळून येते की, फिर्यादी यांनी अभियोग पक्षास समर्थन दिले नाही. उलटपक्षी आरोपीशी न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य

केले आहे. प्रस्तुत प्रकरणात परिस्थितीजन्य पुरावे जसे की, वैद्यकीय कागदपत्रे, घटनास्थळ व जप्ती पंचनामे आरोपीतर्फे मान्य करण्यात आले असले तरी प्रकरणातील मुख्य साक्षीदार म्हणजे फिर्यादी यांनी त्यांना मारहाण, शिवीगाळ केली किंवा धमकी दिली हया बाबी पुराव्यात नाकारल्या असल्याने सदर परिस्थितीजन्य पुराव्यांना काही महत्व राहत नाही. सबब, उपलब्ध पुरावा आरोपीने भा.दं.वि. कलम ३२५, ३२४, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा केला हे निसंशयपणे शाबीत करु शकत नाही. तरी कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार अशा संदिग्ध व अस्पष्ट पुराव्याचा फायदा आरोपीला मिळणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे मी प्रश्न क्र.१ ते ४ चा निष्कर्ष नकारात्मक नोंदवित आहे. आरोपी तर्फे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७अ चे पुर्ततेसाठी आरोपीचा पुर्वीचा जामीन कायम करण्यात आलेला असल्याने त्यासंदर्भात स्वतंत्र आदेश नाही. सबब, प्रश्न क्र. ५ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

१. आरोपी **राजेंद्र महादेव सिरसाट** यांची भारतीय दंड विधान कलम ३२५, ३२४, ५०४, ५०६ च्या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक व जामिनदाराचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७(अ) प्रमाणे रु. १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

४. जप्ती मुद्देमाल एक लाकडी दांडा मुल्यहिन असल्याने त्याची अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उदघोषित करण्यात आला.)

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.03.09 17:40:45 +0530

दिनांक : ०६.०३.२०२६.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बाळापूर.

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | A.S.Gawali |
| Date of Decision | :- | 06.03.2026 |
| Judgment signed by P.O on | :- | 06.03.2026 |
| Judgment uploaded on | :- | 09.03.2026 |